ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख ३० जून, १९५४ | अंक १५

## विविध माहिती

**डबाबंद दुधाचा कारखाना**—दुधाची भुकटी तयार करण्यासाठी व डबाबंद दुधाचे डबे तयार करण्याचा कारखाना काढण्यासाठी भारतीय सरकारनें खाजगी भांडवलदारांना आवाहन केलें आहे असें समजतें. अशा तऱ्हेचा कारखाना देशांत नसल्यानें भारताला परदेशाकडून दरवर्षी २१,५०० टन दुधाचे पदार्थ मागवावे लागतात. ह्यापैकी १,००० टन दुधाची भुकटी व १,५०० टन डबाबंद दूध लष्करांत खपतें, व बाकीचे पदार्थ इतर नागरिकांत खपतात.

**गुन्हेगारांना सक्तीचें शिक्षण**—प. बंगाल सरकारनें राज्यांतील तुरुंगांत शिक्षा भोगीत असलेल्या प्रौढ गुन्हेगारांना सक्तीनें शिक्षण देण्याचें ठरविलें आहे. ह्या योजनेसाठी १६,००० रुपये प्राथमिक खर्च येणार असून शिवाय दरवर्षी ९,००० रुपये खर्च लागेल.

**छत्र्यांच्या विम्याची सोय**— ब्रिटनमध्यें पावसाळ्यांत वापरण्यासाठी म्हणून पॅगोडासारख्या छत्र्या काढण्यांत आल्या आहेत. ह्या छत्र्यांना गुलाबी रेशमाचें कापड वापरण्यांत आलें असून त्या गायब झाल्यास नुकसानभरपाई देणारा सहा महिन्यांचा विमाहि खरेदी करणाराला देण्यांत येतो.

**भारतीय रेल्वेवरील धान्याचीं दुकानें**—मार्च, १९५४ अखेर भारतीय रेल्वेवर ३०३ धान्यविक्रीचीं दुकानें होतीं. १९५३-५४ सालीं ह्या दुकानांनीं १०,२५,८२,००० रुपये किंमतीच्या मालाची उलाढाल केली.

**भारतामधील भाताची लागवड**— १९५२-५३ सालीं भारतांत एकूण ७,४२,०६,००० एकर जमिनींत भाताची लागवड करण्यांत आली होती. १९५३-५४ सालीं सुमारे ७,६६,४६,००० एकर जमिनींत भाताची लागवड करण्यांत आली असावी, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**प्लॅस्टिकच्या कारखानदारांची परिषद**—ऑल इंडिआ प्लॅस्टिक्स मॅन्युफॅक्चरर्स ह्या संघटनेची ७ वी परिषद कलकत्ता येथें श्री. जी. डी. बिनानी ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. परिषदेचें उद्घाटन प. बंगालचे गव्हर्नर डॉ. मुखर्जी ह्यांनीं केलें. ह्या धंद्यापुढील प्रश्नांचा विचार करून मार्गदर्शन करण्यासाठी भारताच्या सर्व भागांतून प्रतिनिधी हजर राहिले होते.

**भारत-हंगेरी व्यापारी करार**—भारत व हंगेरी ह्यांनीं आपसांत एक व्यापारी करार केला असून त्याची अंमलबजावणी तावडतोब सुरू होणार आहे. कराराची मुदत १९५५ अखेर आहे. हंगेरीबरोबर व्यापारी करार असलेल्या इतर देशांना ज्या सवलती मिळतात त्या भारतालाहि मिळणार आहेत. भारत हंगेरीला सुलभ चलनाचा देश म्हणून मानील.

**कानपूर येथें औद्योगिक वस्तुसंग्रहालय**—कानपूर येथें औद्योगिक वस्तुसंग्रहालय स्थापन करण्याविषयीं सल्ला देण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारनें एक सल्लागार-समिति नेमली आहे. वस्तु संग्रहालय काढण्यासाठी पैसा कसा उभारावा आणि तपशीलवार योजना कशी करावी ह्यासंबंधीं समितीनें सल्ला द्यावयाचा आहे. समितीवर कामगार व कारखानदार ह्या दोघांचेहि प्रतिनिधी आहेत.

**नवा कांचेचा कारखाना**—दुर्बिणी अगर चष्मे ह्यांसारख्या वस्तूंना लागणारीं भिंगें तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचा विचार उत्तर प्रदेश सरकार करीत आहे. त्याशिवाय विजेच्या दिव्याचे बल्बस तयार करण्याचा कारखानाहि काढण्याचा विचार चालू आहे. उत्तर प्रदेशाला दरवर्षी २० लाख रुपये किंमतीचे विजेचे दिवे आयात करावे लागतात.

**अमेरिकेंतील बोटी बांधण्याचा धंदा**— चालू वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत अमेरिकेच्या बोटी बांधण्याच्या कारखान्यांतील कामांत २५ टक्के घट झाली आहे. सर्व जगांत ह्या प्रकारच्या कामांत ५ टक्के घट झालेली आहे. १९५३ च्या शेवटच्या तिमाहींत ह्या धंद्यांत अमेरिकेचा सहावा क्रम होता. आतां अमेरिकेचा नंबर सातवा लागतो.

**शिक्षणासाठी ४५ कोटी रुपये**—पंचवार्षिक योजनेंत शिक्षणासाठी जितकी रक्कम देण्यांत आली आहे, त्यापेक्षा आणखी ४५ कोटी रुपयांची मागणी भारतीय सरकारच्या शिक्षणखात्यानें नियोजन-मंडळाकडे केली आहे असें समजतें. जादा रक्कम देण्यांत आल्यास त्यांतील ७ कोटी रुपये विद्यापीठपूर्व शिक्षणाच्या योजनांसाठी, ६ कोटी तांत्रिक शिक्षणासाठी व ५ कोटी विद्यापीठांतील शिक्षणासाठी खर्च करण्यांत येणार आहेत.

**उत्तर प्रदेशांतील सिमेंटचा कारखाना**—उत्तर प्रदेश सरकारच्या रॉबर्टसगंज येथील सिमेंटच्या कारखान्यांत पुढील महिन्यापासून उत्पादनाला प्रारंभ होईल. इंग्लंडमधील हेन्री पुली ही कंपनी सरकारला तांत्रिक सल्ला देणार आहे. कारखाना उभारण्यासाठी ४५० लाख रुपये खर्च आला. भारत सरकारचे सध्याचे फिनॅन्स सेक्रेटरी श्री. बी. जी. राव हे कारखान्याचे पहिले मॅनेजर म्हणून काम करणार असल्याचें समजतें.

**इराणसाठी ब्रिटनचे ट्रॅक्टर्स**—ब्रिटनकडून १६,००,००० पौंड किंमतीची शेतीची यंत्रसामुग्री आयात करण्याचा करार इराणनें केला आहे. ह्या सामुग्रींत १,००० ब्रिटिश ट्रॅक्टर्सचाहि समावेश करण्यांत आला आहे. सर्व साहित्य ब्रिटननें तीन वर्षांत उधारीनें पुरवावयाचें आहे. ब्रिटन व इराण ह्यांचे राजनैतिक संबंध पुन्हां सुरू झाल्यानंतरचा हा पहिलाच व्यापारी सौदा आहे.

## पेप्सु राज्यांत सायकलींचा कारखाना

पेप्सु राज्यांत सायकलींचा एक कारखाना नव्यानें निघणार आहे असें समजतें. पतिआळापासून कांहीं अंतरावर राजपुरा नांवाचें निर्वासित-नगर आहे. ह्याच ठिकाणीं कारखाना काढण्याचें घाटत आहे. कारखान्यासाठीं लागणारें भांडवल एक खाजगी कंपनी जमा करणार आहे. सुमारें ३० लाख रुपये भांडवल लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. प्रथमतः कारखान्यांत सायकलींची जुळणी करण्याचें काम करण्यांत येईल. परंतु संपूर्ण सायकलींचें उत्पादन करणें हें कारखान्याचें ध्येय आहे. पेप्सु राज्य सरकारनें कारखान्याच्या चालकावर कांहीं अटी घातल्या आहेत. त्यांत एक अट अशी आहे कीं सायकलींचा जो भाग भारतांत तयार होत असेल तो कारखान्यानें आयात करतां कामा नये. कारखान्यांत सायकलींचें उत्पादन पूर्णपणें सुरू झालें म्हणजे दरसाल ५०,००० सायकली तयार करण्यांत येतील. ह्याच ठिकाणीं आणखीहि दोन कारखाने काढण्यांत येणार आहेत. त्यांपैकीं एक हाडांच्या खताचा असून दुसरा "गंधू"चा आहे. निर्वासितांत माजलेली बेकारी कमी करण्याच्या दृष्टीनें ह्या कारखान्यांचा बराच उपयोग होईल. ह्या भागांतील बेकारीचा प्रश्न अतिशय गंभीर स्वरूप धारण करूं लागल्यामुळें त्यावर कांहींतरी उपाययोजना करणें निकडीचें झालें होतें. सुमारें २०,००० निर्वासितांना राजपुरा येथें वसती करण्यासाठीं हलविण्यांत आलें होतें. त्यांना उद्योगधंदा पुरविण्यासाठीं एक बुटांचा कारखाना व रेल्वे वर्कशॉप काढण्यांत यावयाचें होतें. परंतु कांहीं कारणामुळें ह्या योजना मूर्त स्वरूपांत येऊं शकल्या नाहींत. ह्या भागांत दोन स्टार्चचे कारखाने आणि एक बिस्किटांचा कारखाना होता, पण निर्वासितांना पुरेसा रोजगार हे कारखाने पुरविणें अशक्यच होतें. म्हणून अधिक कारखान्यांची उभारणी आवश्यक झाली.

---

## भूदानाची प्रगति

| राज्य | २५-३-५४ अखेर मिळालेली जमीन (एकर) | दानपत्रें (संख्या) | वाटलेली जमीन (एकर) |
|---|---|---|---|
| आसाम | १,३४९ | — | — |
| आंध्र | १३,९६४ | ५५२ | — |
| उत्कल | ७२,३५१ | २१,७२८ | — |
| उत्तर प्रदेश | ५,०१,२६८ | १३,१७० | ४१,९१८ |
| कर्नाटक | १,८०९ | २३९ | — |
| केरळ | १७,००० | १,२०० | — |
| गुजरात | २६,२७७ | २,९१७ | — |
| तामिलनाड | २१,०१५ | ३,२०४ | २५६ |
| दिल्ली | ९,२४५ | २४९ | ४ |
| पंजाब | ४,२०५ | १,३२७ | — |
| बंगाल | १,५२५ | ९९४ | — |
| बिहार | १५,३०,००० | १,५७,२५७ | — |
| मध्यप्रदेश | ६५,६८४ | १२,००० | १,००६ |
| मध्यभारत | ६०,७५७ | ४,७९९ | — |
| महाराष्ट्र | ११,९६३ | ७६९ | — |
| म्हैसूर | ३,२६९ | १,२७५ | — |
| राजस्थान | ६,१७,८९८ | १,८१५ | २,०५० |
| विंध्य प्रदेश | ४,९६३ | ८२३ | १२६ |
| सौराष्ट्र | २६,५०० | — | — |
| हिमाचल प्रदेश | १,३७७ | ६६ | — |
| हैद्राबाद | ८३,०३५ | ३,२७४ | १०,५०५ |
| एकूण | २७,७५,४५४ | २,२७,६४८ | १३,५३८ |


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*रॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५३ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,९९,००० |
| ठेवी | रु. | ७२,६८००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी. बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



# सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लाख |
| रिझर्व व फंडस् | ५¼ लाख |
| ठेवी व इतर | १ कोटी |

— व्याजाचे दर —

द. सा. द. शें.

| | |
|---|---|
| करंट ... ... | रु. ½ |
| सेव्हिंग ... ... | रु. १½ |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २ |
| १ वर्ष मुदत .. | रु. ३ |
| २ वर्ष मुदत ... | रु. ४ |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. ३० जून, १९५४



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सहकारी साखरकारखान्यांस सक्रिय प्रोत्साहन

लोणी ( अहमदनगर ) येथील सहकारी साखर-कारखान्याच्या यशानें इतर ठिकाणींहि सहकारी तत्त्वावर साखर कारखाने काढण्यास चालना मिळाली आहे, आणि गोदावरी कालव्यावरहि एक सहकारी कारखाना नोंदविण्यांत आला आहे. नव्या साखर-कारखान्यांच्या स्थापनेस भारत सरकार परवाने देणार आहे. ह्यापुढें स्थापन व्हावयाचे कारखाने सहकारी सोसायटयांच्या मालकीचे असावेत व ते त्यांनींच चालवावेत, अशी प्लॅनिंग कमिशनची शिफारस आहे. ह्या राज्यांत नवे साखर-कारखाने स्थापतांना सहकारी उपक्रमांसच फक्त परवाने देण्याचें धोरण सरकारनें स्वीकारलें पाहिजे, असें एक पत्रक मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिटयूटचे ऑनररी सेक्रेटरी, श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांनीं दोन महिन्यांपूर्वी काढले होते, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. मुंबई सरकारनें ह्या संबंधांत अभिनंदनीय हालचाल केली असून सहकारी साखर-कारखान्यांच्या स्थापनेस अनुकूल असें धोरण आखलें आहे. त्याचा फायदा हितसंबंधीयांनीं घेतला पाहिजे.

मुंबई राज्यांतील ऊस पिकणाऱ्या प्रदेशांचा पद्धतशीर रीतीनें उपयोग केला जावा आणि साखरेचे नवीन कारखाने काढणाऱ्या लोकांना सुलभपणें अर्ज करतां यावे, आणि अशा अर्जांची सरकारला योग्य प्रकारें छाननी करतां यावी म्हणून, ज्या भागांत उसाचा पुरेसा पुरवठा होत असेल आणि जेथें किफायतशीर असे साखरकारखाने काढणें शक्य होईल अशा भागांची सरकारनें पाहणी केली आहे.

मुंबई-सरकारनें केलेल्या पाहणीवरून खालील तक्त्यांत दाखविल्याप्रमाणें १२ ठिकाणीं किफायतशीर असे साखरकारखाने काढणें शक्य होईल असें दिसून आलें आहे.

### अर्ज करण्याची पूर्वतयारी

या भागांत सोइस्कर अशा ठिकाणीं सहकारी तत्त्वावर साखर-कारखाने काढण्यांत यावेत, अशी मुंबई सरकारची इच्छा आहे. अशा कारखान्यांचे शेअर घेऊन त्यांना मदत करण्यास मुंबई सरकार तयार आहे. यासाठी सहकारी संस्था स्थापन करण्यास ज्या संस्था अगर व्यक्ति तयार असतील त्यांनीं याबाबत मुंबई सरकारचे विकास खात्याचे सेक्रेटरी, सेक्रेटरीएट ॲनेक्स, मुंबई यांच्याकडे १५ जुलै १९५४ च्या आंत अर्ज करावेत. जागे-संबंधींचा अधिक तपशीलहि सदरहू अधिकाऱ्यांकडे मिळेल. सहकारी संस्थांच्या सभासदांना कमींत कमी १० लाख रुपयांचें शेअर-भांडवल उभें करावें लागेल; आणि अशी संस्था स्थापन झाल्यास अथवा अस्तित्वांत असल्यास ती जरूर तेवढें भांडवल उभें करूं शकेल आणि संबंधित भागांत पिकणारा ऊस मिळवूं शकेल असें सर्टिफिकेट, अर्जदारानें त्याच्या भागाच्या असिस्टंट रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज यांच्याकडून मिळवून अर्जासोबत पाठवावें.

| अं. क्र. | जागा | मध्यवर्ती गांव | ऊस लागवडीचा प्रदेश (उप-कालव्याच्या मधीलं प्रदेश ) |
|---|---|---|---|
| १ | मुख्य नीरा बारामती रस्त्यापासून उप-कालव्याच्या बाजूनें एक मैलाचा टापू | कोऱ्हाळे बुद्रुक | नं. २ ते १८ |
| २ | बारामती-फलटण रस्त्यावर मालेगांव कॉलनीच्या जवळ | मालेगांव बुद्रुक | १८ ए. ते १६ |
| ३ | सणसर गांवाच्या सरहद्दीवर आणि उघाट बारामती-इंदापूर रस्ता | सणसर | २७ बी. ते ४५ |
| ४ | बेलापूर देवळाली रस्त्यापासून तीन मैल | अंबी | सबंध कालवा |
| ५ | श्रीरामपूर नेवासे रस्त्यापासून चार मैल | करेगांव | १० ते १६ |
| ६ | रहाते चितळ रस्त्यावर | रहाते | १२ते डब्ल्यू. सी. ४०, ४१ |
| ७ | कोपरगांव मनमाड रस्त्यापासून चार मैल | टाकळी | १ ते ८ |
| ८ | मालेगांव-सटाणा रस्त्यापासून तीन मैल | घांदुरी | १ ते ३ |
| ९ | इचलकरंजी ( कोल्हापूर जिल्हा ) | (१) शिरोळ (२) करवीर (३) हातकणंगले (४) कागल या तालुक्यांत | जागेपासून १० मैलांचा टापू |
| १० | बाजार भोगांव किंवा काले ( कोल्हापूर जिल्हा ) | (१) पन्हाळा (२) शाहूवाडी (३) बावडा(महाल) या तालुक्यांत | ” |
| ११ | बिद्री किंवा मुरगूड | (१) कागल (२) करवीर (३) राधानगरी (४) भूदरगड या तालुक्यांत | ” |
| १२ | मुगूट-खान्हुवळी ( बेळगांव जिल्हा ) | (१) बेळगांव (२) खानापूर (३) बैलहोंगल या तालुक्यांत | ” |

## “ कण आणि क्षण ”

### दुसऱ्या आवृत्तीचें प्रकाशन

श्री. श्री. वा. काळे ह्यांच्या “कण आणि क्षण” ह्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचें प्रकाशन दि. ८ जुलै रोजीं होणार आहे.

# बँकिंग धंद्यांतील कांहीं साध्या गोष्टी

(लेखक : " एक बँकर ")

ता. १३-६-५४ चे केसरींतील 'साध्या साध्या गोष्टी' या श्री. श्री. वा. काळे ह्यांच्या लेखांतील 'बँक मॅनेजर व खातेदार' असा एक दृष्टांत वाचला. अशा साध्या कितीतरी बाबी दैनंदिन व्यवहारांत आपण दुर्लक्षित असतों; तथापि त्या दुर्लक्षामुळें इतर काय परिणाम होतात, हें श्री. काळे ह्यांनीं त्यांच्या लेखांत चांगल्या तऱ्हेनें निदर्शनास आणलें आहे.

सदर लेखावरून आमचे व्यवसायाशीं संबंधीत अशा बऱ्याच गोष्टी 'उद्बोधक' म्हणून देतां येतील. त्यापैकीं सोबत कांहीं सांगितल्या आहेत.

## १. बँकांचे सभेंतील 'आक्षेपार्ह' शब्दप्रयोग.

बँकांची वार्षिक सर्वसाधारण सभा ही बँकेच्या वर्षातील कामकाजाचा अहवाल, ताळेबंद, नफातोटा पत्रक, वगैरे बाबी भागीदारांचे पुढें मंजुरीसाठी ठेवण्याकरितां बोलाविलेली असते. बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा ही एक नैमित्तिक बाब असें न समजतां कांहीं 'बोलके' सभासद् ही एक 'पर्वणी' असें समजून वार्षिक सभेचा उपयोग सार्वजनिक व्यासपीठासारखा करतात. बँकेच्या व्यवहारासंबंधीं अल्प माहितीवर आधारलेल्या, 'बँकेचें हित पाहाण्याचे बुरख्याखालीं' संचालक मंडळावर तसेंच बँकेचे व्यवहारावर टीकात्मक भाषणांत "बँकेचे व्यवहारांत गोंधळ—घोटाळा" वगैरे शब्दांचा भरपूर प्रमाणावर अशा लोकांचेकडून उपयोग केला जातो. सभासदांनीं आपलेवरील जबाबदारी ओळखून आपण एका "पत-संस्थेबद्दल" (Credit Institution) बोलत आहोंत; या बोलण्याचा परिणाम इतरत्र धंद्यांवर अगर संस्थांवर अथवा इतर सभासदांवर काय होईल याचा विचार करावयास पाहिजे. केवळ सभेचें लक्ष आकर्षून आपण संस्थेचें फार मोठें हित साधीत आहोंत अशा भ्रामक कल्पनेनें असे शब्दप्रयोग करणें बरोबर होणार नाहीं.

* * *

## २. कागद करून ठेवा, आतां येतो !

कर्ज मंजुरीनंतर कर्जरोखा पुरा करणेंसाठी कर्जदार बँकेंत येतात. कर्जदाराची, विशेषत: त्यांचे जामीनदारांची गैरसोय होऊं नये, खोटी होऊं नये, म्हणून कर्जदार मॅनेजरना 'कागदपत्र तयार ठेवा; आतां येतो' असें सांगून जातात. बँक मॅनेजरहि सर्व कागदपत्र तयार ठेवून कर्जदार कागदपत्र पुरे करण्यास येतील म्हणून थांबून राहतो. अनेक वेळां असा अनुभव येतो कीं हीं मंडळी सांगितल्या प्रमाणें येत तर नाहींतच, परंतु कित्येक प्रसंगीं तारखा बदलून दुसरे कागदपत्र करून घ्यावे लागतात. बँकेंतील ऑफीसरचा, कारकुनाचा वेळ व श्रम फुकट जातात याची जाणीव फारच थोड्यांना पटते.

* * *

## ३. आधीं हा चेक पास करा व दुसरा उद्यां बोलवा.

बँकेंतील खातेदारांना व्यवहाराचे दृष्टीनें बँक-मॅनेजर नियमांचें उल्लंघन होऊं न देतां शक्यतों कांहीं सवलती देतच असतात. तथापि अनेक वेळां असे प्रसंग निर्माण होतात कीं, खातेदार या सवलती हक्काचे स्वरूपांत मागूं लागतो. ज्यांचे व्यवहार मोठ्या प्रमाणांत चालत असतात अशा खातेदारांत असाहि एक वर्ग आहे कीं ज्यांची बँकेनें, केवळ आपण या बँकेचे खातेदार आहोंत म्हणूनच कीं काय त्यांची पत संभाळावी ! अनेक वेळां असे खातेदार "हा चेक आधीं पास करा व दुसरा उद्यां बोलवा" असें हक्कानें सांगण्याचा प्रयत्न करीत असतात. खातेदारांची पत बँकरनें संभाळणें हा जरी एक व्यवहारी भाग मानला, तरी बँकेचे कारकुनावर अथवा मॅनेजरवर अशा भिडेचें दडपण टाकणें योग्य नव्हे.

* * *

## ४. जामीनाच्या नीतिमत्तेचा मासला.

बँकेंतून कर्ज घेतांना जामीन म्हणून जबाबदारी पत्करूनहि बँकेच्या देण्यांतून सुटण्यासाठी जामीनदार कोणत्या व किती खालचे पातळीवर जाऊं शकतो याचा नमुना खालीं सारांश रूपानें देत आहोंत. हेतु इतकाच कीं, बँकरनें कर्जदार व जामीनदार यांच्या नितीमत्तेचाहि (Business morality) अभ्यास करणें अवश्य आहे. बँकेच्या देण्याचे जबाबदारींतून सुटण्यासाठी हा जामीनदार म्हणतो—

"बँक असून ती रजिस्टर झाली आहे किंवा नाहीं हें माहीत नाहीं. बँकेच्या अधिकाऱ्यास मी ओळखत नाहीं. बँकेंत जामीनदार म्हणून सह्या केलेल्या नाहींत. कर्जदारास मी जामीन राहिलों नाहीं. तथापि कोर्टास जर असें वाटलें कीं मी या व्यवहारास जामीन आहे तर कर्जफेडीस सवलतींचा हप्ता मिळेल असा हुकूम व्हावा."

कोर्टानें जामीनदारावर हुकूमनामा दिलाच व शिवाय जामीनदारानें बेजबाबदारीनें केलेल्या कैफियतीबद्दल कडक शब्दांत कानउघाडणी केली.

* * *

## ५ डिफॉल्टर्स डायरेक्टर

सहकारी बँकांतून नियमित हप्ते न भरणाऱ्या कर्जदारांना 'दंडाचें व्याज' (Penal Interest) आकारण्याची पद्धति आहे. ह्या दंडाचे व्याजाचा दर मूळ व्याजाचे दीडपट इतका ठेवलेला असतो. जे कर्जदार नियमित हप्ते भरीत नाहींत त्यांना डिफॉल्टर असें समजण्यांत येते. अशा कर्जदारांचा वर्ग बँकेला व्याजरूपानें जास्त नफा मिळवून देतो. अशा अनियमित कर्जदारांच्या अडचणी काय असतात त्या डायरेक्टर बोर्डास समजण्यासाठी त्यांचा एक प्रतिनिधी बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवर घ्यावा असा ठराव एका सहकारी बँकेचे वार्षिक साधारण सभेपुढें एका सभासदानें आणला; तसेंच 'डिफॉल्टर्स डायरेक्टर' ही जागा 'रिझर्व्ह सीट' म्हणून असावी असाहि दावा त्यानें मांडला ! अर्थात् या ठरावाची योग्य तीच वासलात लागून ठराव मांडणारानें तो परत घेतला.

* * *

## ६ टेलिफोनवरून "खात्याची शिल्लक किती ?"

पुष्कळ खातेदारांना आपले खात्यांतील शिल्लक किती हें टेलिफोनवरून विचारण्याची संवयच असते. टेलिफोनवरून शिल्लक किती असा प्रश्न मॅनेजरला कोणी खातेदारांनीं विचारला नाहीं असा क्वचितच दिवस जात असेल. खात्यावरील शिल्लक सांगणें हें जरी बँकेचें कर्तव्य असलें, तरी खातेदारानें टेलिफोनवरून खात्याची शिल्लक विचारणें ही-चूक होय. खातेदारांतर्फे कोणीहि माणसानें फोनवरून शिल्लक विचारावी व ती मॅनेजरनें सांगावी असेंहि बंधन मॅनेजरवर नसतें; तथापि व्यवहार संभाळण्याचे दृष्टीनें विचारणाराबद्दल खात्री करून घ्यावी लागते. पुष्कळ वेळा मॅनेजरचे खोलींत असणाऱ्या दुसऱ्या कामासाठी आलेल्या लोकांनाहि टेलिफोनवरून सांगितलेली शिल्लक कळूं शकते. टेलिफोनवरून शिल्लक न सांगण्याची प्रथा आमचे इकडील बँकांतून पाडल्यास ती एक इष्ट सुधारणा होईल.

### ब्रिटनची सायकलींची व मोटार सायकलींची निर्यात

चालू वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत ब्रिटननें ९०,००,००० पौंड किंमतींच्या सायकलींची व मोटार सायकलींची निर्यात केली. ह्या किंमतींत सुटे भाग व टायर ह्यांची किंमतहि धरण्यांत आली आहे. १९५३ च्या पहिल्या सहा महिन्यांत ९२,००,००० पौंड किंमतीचा ह्याच प्रकारचा माल निर्यात करण्यांत आला होता. फक्त मार्च ह्या महिन्यांतच २३,००,००० पौंड किंमतीच्या सायकली निर्यात करण्यांत आल्या. ९,५५,८०० पौंड किंमतीच्या मोटार-सायकली निर्यात करण्यांत आल्या. सायकलींच्या व मोटार–सायकलींच्या कारखानदारांकडे अधिकाधिक मागण्या नोंदविण्यांत येत असून उरलेल्या वर्षांत मालाची परदेशीय विक्री वाढतच जाईल असा त्यांचा अंदाज आहे. १९५२ सालीं ४,३६,००,००० पौंड किंमतीचा माल परदेशांत निर्यात करण्यांत आला होता. गेल्या वर्षी ३,६१,००,००० पौंड किंमतीचाच माल निर्यात करण्यांत आला होता. परंतु चालू सालीं १९५२ ची बरोबरी केली जाईल असें कारखान्यांना वाटत आहे. अमेरिकेमध्यें ब्रिटिश सायकली अधिक खपू लागल्या आहेत. मार्च महिन्यांत ३,४०,००० पौंडांच्या सायकली अमेरिकेंत विकण्यांत आल्या. जानेवारीपेक्षा हा आकडा तिपटीनें अधिक आहे. इतर कोठल्याहि परदेशी बाजारपेठेपेक्षा अमेरिकेंत मार्च महिन्यांत दुप्पट अधिक सायकली खपल्या. मोटार–सायकलींच्या बाजारांत कमी अश्वशक्तीच्या छोट्या गाड्यांना विशेष मागणी आहे. त्यामुळें ब्रिटनमधील कारखानें ह्या प्रकारच्या मोटार–सायकलींचें उत्पादन वाढवीत आहेत. गेल्या वर्षापासून एका कारखानदारानें आपलें उत्पादन ४० टक्क्यानें वाढविलें. परंतु तरीहि त्याला परदेशी बाजारपेठांची मागणी पूर्ण करण्यांत यश आलेलें नाहीं. परदेशी व्यापाऱ्यांची मागणी भागवितां यावी म्हणून देशांतील बाजारांत तो आपला माल पाठवूं शकत नाहीं.

---

### ब्रिटन ( ॲन ऑफिशिअल हँडबुक )

लंडन येथील सेंट्रल ऑफिस ऑफ इन्फर्मेशननें तयार केलेलें हें हँडबुक जानेवारी, १९५४ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. परदेशांतील लेखक, शिक्षक, अधिकारी, सार्वजनिक पुढारी, इत्यादींना ग्रेटब्रिटनविषयीं नेहेमीं लागणारी माहिती एकत्र करून प्रथम १९४६ मध्यें पुस्तकरूपानें छापण्यांत आली. त्याची उपयुक्तता तात्काळ सिद्ध झाली; पुस्तकाच्या अनेक आवृत्त्याहि निघाल्या. प्रस्तुत हँडबुक आतां केवळ परराष्ट्रांतच नव्हे तर ग्रेट ब्रिटनमध्येंहि विकत मिळूं शकतें. हँडबुकाचा उद्देश ब्रिटिश राज्यकारभार व अर्थव्यवहार ह्यांची स्थूल कल्पना देणें हा आहे. नागरिकांच्या जीवनांत सरकारी उपक्रमांचें अंग किती आहे, हेंहि हँडबुकावरून समजून येईल. तथापि, हँडबुकाचा मुख्य उद्देश परराष्ट्रांतील वाचकांची गरज भागविणें हाच आहे. हँडबुकाची पृष्ठसंख्या ३३४ असून ती मुख्यतः १२ प्रकरणांत विभागलेली आहे. उपयुक्त नकाशेहि देण्यांत आले आहेत. शेवटीं दिलेली २० पृष्ठांची विस्तृत सूची फारच उपयुक्त वाटेल. ग्रेटब्रिटनविषयीं व तेथील राज्यकारभार, लष्कर, कर, व्यापार, उद्योग, वहातुक, कामगार, आरोग्य, शिक्षण, धर्म, शास्त्रें, कला, रेडिओ, वृत्तपत्रें, इत्यादींची माहिती जिज्ञासूंना फारच उपयुक्त वाटेल. किं. ६ शिलिंग. ( प्रस्तुत हँडबुक लॉर्ड रे महाराष्ट्र इं. म्युझियम, पुणें, येथें पहावयास मिळेल. )


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई.

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल व रिझर्व | रु. | ११,७०,१०० |
| ठेवी .... .... .... | रु. | १,१९,११,७०० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,३३,९४,५०० |

शाखा:- दादर माहीम
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात
शाखा:- बेळगांव पुणें



स्थापना १९१८

---

म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी !!

दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुरअरन्स कं. लि.

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७
हयातीनंतरच्या विम्यास: ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई — शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

---

भोर स्टेट बँक लि.
[ स्थापना : १९४४ ]
मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.
शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी.
श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.
पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर.
एन. व्ही. पांडव, मॅनेजर

## रशियाचें औद्योगिक उत्पादन

सोव्हिएट-रशियाच्या जन्मापासून त्या राष्ट्राच्या प्रतिनिधींनें आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेच्या कार्यांत भाग घेतलेला नव्हता. परंतु परिषदेच्या नुकत्याच भरलेल्या बैठकींत मि. निकोलो क्रेस्टॉव्ह हे आपल्या देशातर्फे हजर राहिले होते. रशिआच्या औद्योगिक उत्पादनाबाबत बोलतांना ते म्हणाले कीं, रशिआंतील भारी उद्योगधंद्यांचें उत्पादन १९४० च्या मानानें हल्लीं तिप्पट झालेलें आहे. यांत्रिक उद्योगधंद्यांचें उत्पादन चौपट झालें असून कामगारांच्या वेतनांत ११९ टक्के वाढ झाली आहे. श्री. क्रेस्टॉव्ह हे मास्को येथील डायनॅमो इलेक्ट्रिकल वर्क्सचे प्रमुख आहेत. औद्योगिक संबंधांविषयीं त्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, रशिआंत कारखान्याचा प्रमुख चालक हा प्रत्यक्षपणें सरकारला जबाबदार असतो. कामगारांना कामावर ठेवणें अगर काढून टाकणें त्याच्याच हातीं असतें. हा प्रमुख स्थानिक कामगार संघाशीं करार करतो. करारांत कामगारांचें वेतन, त्यांचें शिक्षण, आरोग्य, रहाण्याची व्यवस्था व कामाची परिस्थिति ह्या बाबीं-संबंधीं उभयतांना मान्य असे नियम करण्यांत येतात. त्याच प्रमाणें कामगारांच्या सांस्कृतिक पातळीविषयींहि दक्षता घेण्यांत येते. कम्युनिस्ट राष्ट्रांतील प्रतिनिधी हे मालकांचे प्रतिनिधी होऊं शकतील कीं नाहीं ह्यासंबंधीं परिषदेंत भांडवलदार राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं वाद उत्पन्न केला होता. परिषदेंत सरकारचे प्रतिनिधी मालकांचे प्रतिनिधी आणि मजुरांचे प्रतिनिधी असे तीन प्रकारचे प्रतिनिधी असतात. परिषदेच्या अधिकारपत्र-समितीनें अल्बेनिआ, बल्गेरिआ, बोलिव्हिआ, चीन व हंगेरी ह्या राष्ट्रांना कामकाजांत भाग घेण्यास आक्षेप घेतला. त्यांनीं आपल्या वाट्याची पूर्वीची वर्गणी न भरल्यानें समितीनें विरोध केला. १९४८ सालीं त्यांना वर्गणीसंबंधीं दिलेल्या सवलतीचाहि त्यांनीं फायदा घेतलेला नव्हता.

---

## शेअर-भांडवल हप्त्यानें घेण्याची सोय

कोणत्याहि औद्योगिक कंपनीचें भाग-भांडवल वसूल करण्याची पद्धत ठरून गेलेली आहे. अर्जासोबत कांहीं रक्कम व नंतर कंपनी मागेल त्यावेळीं कॉलच्या रूपानें, अशी ही रक्कम सामान्यतः वसूल करण्यांत येते. भाग घेतांना जरूर तितके पैसे असले तरी कॉल भरण्याच्या वेळीं भागीदारांजवळ पैसे नसण्याची शक्यता असते. अशा परिस्थितींत कंपनी भांडवलाच्या कांहीं भागाला मुकते व भागीदारांचेंहि नुकसान होतें. एका ब्रिटिश औद्योगिक ट्रस्टनें ह्यासंबंधीं नवीन सोयीची योजना आखली आहे. ह्या योजनेप्रमाणें ब्रिटनमधील कोठल्याहि कंपनीचे भाग महिना ठराविक हप्ता देऊन खरेदी करता येतील. अशा प्रकारची योजना ब्रिटनमध्यें प्रथमच अस्तित्वांत येत आहे. अमेरिकेंत मात्र अशा योजना पूर्वीं अमलांत आलेल्या आहेत. योजना तयार करण्याचे काम मि. आर्थर व्हाइटहेड ह्यांनीं केलें आहे. मि. व्हाइटहेड म्हणतात कीं पुष्कळशा संभाव्य भागीदारांना स्टॉक्स व शेअर्सविषयीं पुरेशी माहिती नसते. त्यामुळें त्यांना आपल्याजवळचे पैसे यशस्वी रीतीनें गुंतविता येत नाहींत. शिवाय, त्यांच्याजवळ पुरेसा पैसाहि योग्य वेळीं असतोच असें नाहीं. सामान्य कामगाराला सुद्धा आपल्या मिळकतींमधून कंपन्यांचे भाग खरेदी करणें वरील योजनेमुळें सुलभ होईल आपली अशी कीं, आपला शिल्लक पैसा कोणत्या प्रकारच्या मार्गांत गुंतवावा ह्याविषयीं त्याला सल्लाहि मिळूं शकेल. ब्रिटन मधील कामगार-वर्ग आपला शिल्लक मुख्यतः पोस्टांत, सेव्हिंग्ज सर्टिफिकेटसमध्यें अगर घरें बांधणाऱ्या संस्थांमधून गुंतवितो. ह्या प्रकारच्या पैसे गुंतविण्याच्या पद्धतीबाहेर जाऊन तो आपलें भांडवल गुंतविण्यास तयार नसतो. अर्थातच त्याला भांडवला-वरील नफाहि बेताचाच सुटतो. मि. व्हाईटहेड ह्यांचें म्हणणें असें आहे कीं त्यांनीं आखलेल्या हप्तेबंदीच्या योजनेमुळें कामगारांना अधिक प्रमाणांत भाग घेणें शक्य होईल आणि त्यावर नफाहि अधिक सुटेल.

---

## प्रमुख अमेरिकन नियतकालिकें

अमेरिकन प्रमुख दहा नियतकालिकांचा खप खालीलप्रमाणें आहे. "लाइफ" ५४,७०,०००, "लेडीज् होम जर्नल" ४९,३१,०००, "मॅक्कॉल्स" ४५,५८,०००, "स्टॅंटर्डे इव्हिनिंग पोस्ट" ४४,६६,०००, "वुमन्स होम कंपॅनियन" ४३,८२,००० "फॅमिली सर्कल" ४१,१५,०००, "वुमन्स डे" ३९,५८,००० "वेटर होम्स अँड गार्डन्स" ३७,८४,०००, "लुक" ३७,१८,००० आणि "गुड हाउस कीपिंग" ३४,९०,०००.

---

## वेस्टर्न इंडिया विमा कं. लि, सातारा

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या अध्यक्षांचें भाषण आम्हीं गेल्या अंकीं दिलें आहे, त्यावरून ह्या कंपनीच्या अखंड प्रगतीची सर्वांगीण कल्पना येईलच. कठीण आर्थिक परिस्थितींतहि कंपनीनें विम्याचें वाढतें काम मिळविलें आहे. १९५३ मध्यें कंपनीनें एकूण २,७३,२९५१२ रुपयांचे विमे दिले व आयुर्विमा निधींत ७२½ लक्ष रुपयांची भर टाकून तो ६¾ कोटी रुपयांवर नेला. कंपनीचा इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह फंड रोख्यांच्या किंमतींतील घटीपेक्षा बराच मोठा होता; त्यांतील कांहीं भाग आयुर्विमा निधीकडे वर्ग करण्यांत आला आहे. भागीदारांना डिव्हिडंड देण्यासाठी राखून ठेवलेल्या फंडांतून १९५३ सालाकरितां १५% विनाकर डिव्हिडंड देण्यांत येणार आहे. सर्वच दृष्टींनीं वेस्टर्न इंडियाची परिस्थिति समाधान-कारक, इतकेंच नव्हे तर स्पृहणीय अशी आहे व तिच्या कारभाराचीं धोरणें अनुकरणीय अशीं आहेत. डॉ. राधाकृष्णन् ह्यांनीं कंपनीसंबंधीं काढलेल्या प्रशंसोद्गारांकडे आम्हीं वाचकांचें लक्ष वेधतों.

---

**रांचीला विजेचा पुरवठा**—बिहार राज्य सरकारनें रांचीला व इतर कांहीं गांवांना दामोदर योजनेपासून वीज-पुरवठा करण्याची एक योजना तयार केली असल्याचें समजतें. ह्या योजनेवर १९,७२,४३० रुपये खर्च करावे लागतील. दामोदर धरणावर तयार झालेली वीज प्रथम रामगड येथें राज्य सरकारला देण्यांत येईल. तेथून तारा टाकून ती रांची व आसपासच्या भागाला पुरविण्यांत येईल.

**वेरावळ येथें सोडा ॲशचा कारखाना**—सौराष्ट्रांत काढण्यांत यावयाच्या सोडा ॲशच्या कारखान्यासाठी जागा मुकर करण्याकरितां राज्य सरकारनें एक कमिटी नेमली होती. वेरावळ येथें कारखान्याला लागणाऱ्या कच्च्या मालाची विपुलता असल्यानें हा कारखाना तेथेंच काढण्यांत यावा अशी विनंति सौराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे करण्यांत आली आहे. सोडा ॲशच्या कारखान्याला चुनखडी, मीठ व पाणी ह्यांची आवश्यकता असते.

## कोयना योजनेचे हप्ते व स्थापत्यिक वैशिष्ट्यें

( मुंबई सरकारचे बांधकाम खात्याचे मंत्री, श्री. नाईक-निंबाळकर यांचें मुंबई नभोवाणीवरील भाषण )

कोयना योजनेच्या पहिल्या भागास ३३ कोटी रुपये खर्च लागणार असून तो भाग पंचवार्षिक योजनेंत घेण्यांत आला आहे. या भागांत २ लक्ष ४० हजार किलोवॅट वीज उत्पादन करण्याचे ठरविण्यांत आलें असून त्यांपैकी २ लक्ष ३० हजार किलोवॅट मुंबई–पुणें विभागास व बाकीची १० हजार किलोवॅट कऱ्हाड–मिरज भागास देण्याचे ठरविलें आहे. या भागांत हेळवाकजवळ कोयना नदीवर २०५ फूट उंचीचें धरण बांधण्यांत येणार आहे. या योजनेच्या दुसऱ्या हप्त्यामध्यें धरणाच्या भिंतीची उंची २६८ फुटांपर्यंत वाढविण्यांत येणार आहे. त्यामुळें ९७ हजार दशलक्ष घनफूट पाणी अडविलें जाईल व त्यांपैकी ६७५०० दशलक्ष घनफूट पाणी वीज निर्माण करण्यासाठीं वापरण्यांत येईल आणि २८००० दशलक्ष घनफूट पाणी शेतीसाठीं वापरण्यांत येईल. या दुसऱ्या हप्त्यांत १,६८,००० किलोवॅट अधिक वीज निर्माण होईल. तिसऱ्या हप्त्यांत, पहिल्या दोन हप्त्यामध्यें घाट पायथ्याशीं वीज निर्माण करण्यासाठीं जें पाणी वापरलें जाईल त्याचा पुन्हा उपयोग करून ६०,००० किलोवॅट वीज निर्माण होईल. तसेंच धरणाच्या पायथ्याशी घाटमाथ्यावर ३०,००० किलोवॅट वीज निर्माण करण्यांत येणार आहे. या सर्व योजनेंतून ४,९८,००० किलोवॅट वीज निर्माण होईल.

खर्चापैकीं कांहीं भाग जागतिक बँकेकडून कर्ज म्हणून मिळण्याबद्दल वाटाघाटी चालू आहेत. बँकेचे तज्ज्ञ या कामाची पाहणी करून गेले असून त्यांचा अहवाल बँकेकडे जाऊन सत्वर याबाबत व्यवस्था होईल अशी आशा आहे.

### स्थापत्यिक वैशिष्ट्यें

कोयना योजना ही पाण्याच्या जोरावर वीज उत्पादन करणारी एक प्रचंड योजना आहे. या योजनेमध्यें अनेक स्थापत्यिक वैशिष्ट्यें आहेत. त्यांतील मुख्य वैशिष्ट्य असें कीं कोयना योजनेंतील विद्युत् निर्मिति केंद्र भूगर्भांत म्हणजे डोंगरांत मोठी गुहा खोदून त्यामध्यें तें बसविण्यांत येणार आहे. अशा पद्धतीनें वीज उत्पादन करणारीं केंद्रें जगांत फार थोड्या देशांमध्यें केलीं गेलेलीं आहेत. भारतांत तर अद्याप अशा तऱ्हेचें विद्युत् केंद्र झालेलें नाहीं. ही गुहा डोंगराच्या माथ्यापासून ८०० फूट खालीं राहील. गुहेमध्यें यंत्रसामुग्री नेण्याकरितां व जाण्यायेण्याकरितां एक २८०० फूट लांबीचा बोगदा खोदण्यांत येईल. या केंद्रामध्यें वीजनिर्मिति यंत्रावर पाडलेलें पाणी पुढें वाहून नेण्यास दुसरा एक घोड्याच्या नालासारख्या आकाराचा एक बोगदा साधारण ६८०० फूट लांबीचा खोदण्यांत येईल. खंडाळ्याच्या घाटांतील रेल्वेच्या बोगद्याएवढा तो मोठा असेल. केंद्रांत उत्पन्न झालेली वीज जमिनीवर आणण्यासाठीं तारा घालण्यांत येणार, त्यासुद्धां १३०० फूट लांबीच्या दोन बोगद्यांतून जातील.

दुसरें वैशिष्ट्य असें कीं तलावांतील पाणी डोंगराच्या उतरणीवरून पोलादी नळ टाकून न नेता डोंगरांतच उतरते बोगदे खणून त्यांतून वीज उत्पादन यंत्राकडे नेण्यांत येईल; यामुळें नळाकरितां लागणाऱ्या पोलादाचा खर्च वाचेल. वरून पाहिलें असतां फक्त तलाव व ज्या ठिकाणीं डोंगराच्या पायथ्याला वीज निर्माण करून जें पाणी बाहेर पडेल तेवढेंच दिसणार आहे. बाकी या योजनेपैकीं बाहेरून कोणताही यांत्रिक भाग दिसणार नाहीं. फक्त वीज नेणाऱ्या तारा मात्र दिसतील.

तिसरें वैशिष्ट्य असें कीं या योजनेंत भरपूर पाणी साठविण्यास चांगला पाऊस पडतो अशा खोऱ्यांत उत्तम जागा धरण बांधण्यासाठीं पहाणी करून ठेवली आहे. पाणी उंचावरून घाट पायथ्याशी नेण्यासाठीं डोंगराचा उतारही भरपूर व चांगला आहे. अशी सोयीस्कर जागा वीज निर्मिति केंद्रास क्वचितच उपलब्ध होते.

चौथें वैशिष्ट्य म्हणजे वीज निर्मितीसाठीं जीं यंत्रें बसविण्यांत येणार त्या प्रत्येकाची शक्ति ६० हजार किलोवॅट वीज उत्पन्न करण्याची राहील. हीं यंत्रें सध्या भारतांत सगळ्यांत मोठी वीज उत्पादन यंत्रें होतील.

ही योजना सहा वर्षांत पुरी करण्याचा सरकारचा इरादा आहे.

### अशुभकारक आकडा: घरनंबर बदलला

चेस्टरफील्ड रूरल कौन्सिलनें मि. हेन्री मोरन ह्या खाणीकामगाराला त्याचा घरनंबर बदलण्यास परवानगी दिली आहे. १३ ऐवजीं ११ अ असा त्याचा घरनंबर झाला आहे. मि. मोरन नं. १३ ह्या घरांत एक वर्ष राहिला, तेवढ्यांत त्याला खाणींत अपघात झाला, त्याच्या पत्नीला झालेलें मूल पंगू निघालें, त्याच्या सहा वर्षांच्या मुलीचा हात मोडला, तीन वर्षे वयाची मुलगी पाय घसरून पडली व तिचा दात उडाला आणि धाकट्या दोन वर्षांच्या मुलाला हनुवटीवर मोठें गळूं झालें. १३ हा आकडा अशुभकारक ठरला.

### सर्पदंशाचे बळी

रशिया, पूर्व युरोपांतील प्रजासत्ताक राष्ट्रें व चीन हीं वगळून बाकीच्या जगांत दरसाल ३०,००० ते ४०,००० लोक सर्पदंशानें मरण पावतात, असा वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचा अंदाज आहे. भारतांत दर १०,००,००० मध्यें १५·४ मृत्यु सर्पदंशाचे असतात.

### स्त्री कामगारांविषयीं कांहीं आकडे

भारतांतील कारखान्यांत काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या १९२७ मध्यें २·८ लक्ष झाली, परंतु स्त्री कामगारांचें एकूण कामगारांशीं प्रमाण १६·९५% चें ११·३३% झालें. खाणींत काम करणाऱ्या स्त्रियांचें एकूण खाणकामगारांशीं प्रमाण मात्र १७·९% चें २०·५% झालें. मळ्यांतील कामगारांपैकीं निम्मे पुरुष व निम्म्या स्त्रिया आहेत. एकूण स्त्री कामगारांपैकीं ५० ते ८०% विवाहित असून २० ते ५०% विधवा आहेत.

### सहकारी संस्थांसंबंधीच्या नियमांत दुरुस्ती

१९२७ च्या मुंबई सहकारी संस्थांसंबंधीच्या नियमांत दुरुस्ती करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें असून त्याबाबतच्या हरकती अगर सूचना ता. ३ जुलै १९५४ पर्यंत स्वीकारण्यांत येतील. अशा हरकती अगर सूचना मुंबई सरकारच्या विकास खात्याचे सेक्रेटरी, सेक्रेटरीएट अनेक्स, यांच्याकडे पाठवाव्या. दुरुस्तीचा मसुदा मुंबई सरकारच्या ता. १० जूनच्या गॅझेटांत ४–ब भागांत प्रसिद्ध झाला असून त्यानुसार ३९–अ या नियमांत दुरुस्ती करण्यांत येईल. या दुरुस्तीनुसार, १९२५ च्या मुंबई सहकारी कायद्याच्या ५९ व्या कलमांत नमूद केलेल्या एखाद्या हुकुमाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीनें, त्याच कलमाखालीं कर्जाची वसुली करण्यांत आली असल्यास आणि हुकुमाची अंमलबजावणी करतांना मालमत्तेची विक्री करण्यांत आली नसल्यास, देणेदारानें कर्जवसुलीचा खर्च द्यावा आणि खर्चाचें प्रमाण अमुक इतकें असावें असा हुकूम रजिस्ट्रार देऊं शकतील. सदरहू खर्चाचें प्रमाण कर्जाच्या रकमेच्या १० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाहीं. सध्या ही मर्यादा कर्जाच्या रकमेच्या ५ टक्क्यांइतकीआहे.

### सिंद्री येथील कारखान्याचा आढावा

सिंद्री येथील खताच्या कारखान्यांत उत्पादन करण्यांत येणाऱ्या अमोनिअम सल्फेटच्या किंमती जानेवारी १९५३ पासून दर टनाला ३५० रुपयांच्या ऐवजी २८५ रु. पर्यंत उतरविण्यांत आल्या. चालू वर्षी मार्च महिन्यांत किंमत दर टनामागें १० रुपयांनीं पुन्हा उतरविण्यांत आली. तथापि उत्पादनांत वाढ झाल्यामुळें कारखान्याचें उत्पन्न कायम राखण्यांत आलें आहे. कारखान्यांत दररोज ९६० टन अमोनिअम सल्फेट तयार होऊं शकेल. पण आज प्रत्यक्ष उत्पादन ७५० टनाच्या आसपासच होतें. कारखान्याची यंत्र-सामुग्री नीट चालत नसल्यामुळें उत्पादन अधिक वाढत नाहीं. तथापि चालू वर्षांत यंत्रांच्या बिघाडाचा छडा लावून ती नीट चालतील अशी दक्षता घेण्यांत येत आहे. कारखान्यासाठीं कोक ओव्हन प्लँटची जरूरी होती. जरूर ती यंत्रसामुग्री उभारावयाची झाल्यास त्यासाठीं २·३५ कोटी रुपये अधिक लागले असते. पण कारखान्यानें ही रक्कम सरकारकडून कर्जाऊ न घेतां ती आपल्या घसारा—फंडांतून उभी केली. ही नवी यंत्रसामुग्री येत्या सप्टेंबरपासून काम करूं लागेल असा अंदाज आहे. कारखान्याला लागणारा कोळसा व शिसें बाहेरून न मागविता देशांतूनच पैदा करण्याचा चालकांचा विचार आहे. तसें केल्यानें खताच्या उत्पादनाची किंमत आणखी कमी करतां येईल. कारखान्यानें गेल्या हिशेबाच्या कालांत २·७१ कोटी रुपयांचा ठोक नफा मिळविला. त्यापैकीं २·०९ कोटी रुपयांची रक्कम चालकांनी घसारा व दुरुस्तीचा खर्च म्हणून बाजूला काढून ठेवली. ३६·१६ लाख रुपयांची रक्कम सरकारकडून घेतलेल्या रकमेवरील व्याज देण्यासाठी वापरण्यांत आली. त्याशिवाय २६·३६ लाख रुपयांची रक्कम कारखान्याचा विकास करण्याच्या कामीं लागलेला खर्च म्हणून हिशेबीं टाकण्यांत आली.

---

### नमुनेदार शेती—संघटना

जालंदर जिल्ह्यांत नवानशहर ह्या ठिकाणीं एका समाज विकास योजनेचें कार्य चालू आहे. ह्या योजनेंत १३ नमुनेदार शेतांची संघटना नुकतीच करण्यांत आली. शेतावर काम करणाऱ्या शेतकऱ्यांनीं ४९,१५५ एकर जमिनींतील तण काढून टाकलें आणि १३९ एकर जमीन प्रथमच लागवडीला आणली. त्याशिवाय १,४९५ मण अमोनियम सल्फेट त्यांनीं विकत घेतलें व १०४ शेतीचीं अवजारें खरेदी केलीं. ३२० एफ् ह्या जातीच्या कापसाची लागवड करण्यासाठीं ५६० मण बी खरेदी करण्यांत आलें आणि शेतावर काम करणाऱ्या मजुरांसाठीं ३४६ प्रात्यक्षिकें करून दाखविण्यांत आलीं. खेड्यांतील सांडपाण्याची व्यवस्था नीट करण्यासाठी १४,३७६ फूट लांबीचीं गटारें खोदण्यांत आलीं आणि ४२,७६६ चौरस फूट क्षेत्रफळाचे रस्ते बांधण्यांत आले. खेड्यांतील लोकांना पिण्यासाठीं स्वच्छ पाणी मिळावें म्हणून एक नवीन विहीर खोदण्यांत आली आणि ६ जुन्या विहिरी बांधून काढण्यांत आल्या. निरनिराळ्या खेड्यांत मिळून २७ नवीन घरें बांधण्यांत आलीं. योजनेच्या परिसरांत जे दवाखाने उघडण्यांत आले होते त्यांना २,००० रुपये किंमतीचीं औषधें पुरविण्यांत आलीं. ९ प्राथमिक शाळा व ५ मुलींच्या शाळा उघडण्यांत आल्या. प्रौढांना शिक्षण देणारीं ५ नवीन केंद्रें स्थापन करण्यांत आलीं. त्याशिवाय एक सार्वजनिक रेडिओ व खेळांचे १२ क्लब्स स्थापन करण्यांत आले. एक पतपेढी सुरू करण्यांत आली. ट्यूब विहिरी खणण्यासाठीं ३९,५०० रुपयांचीं कर्जे देण्यांत आलीं. २,३५,७१५ रुपयांचीं कर्जे पंपिंग सेट्स विकत घेण्यासाठी देण्यांत आलीं आणि २३,१७५ रुपयांचीं कर्जे नवीन विहिरी खोदण्यासाठी देण्यांत आलीं. पडीत जमीन लागवडीला आणण्यासाठीं ४,१०० रुपयांचीं कर्जे शेतकऱ्यांना देण्यांत आलीं. मे, १९४५ अखेर ह्या समाजविकास योजनेंत झालेल्या कार्याचा हा आढावा आहे.

---

### भगीरथ : पाटबंधारे व वीजखात्याचें नवें प्रकाशन

भारतांतील पाटबंधारे आणि विद्युत् योजनांच्या विकासास वाहिलेलें 'भगीरथ' नांवाचें मासिक मध्यवर्ती पाटबंधारे आणि वीजखात्यातर्फे या महिन्यापासून प्रसिद्ध केलें जाणार आहे. देशांत ठिकठिकाणीं सध्यां चालू असलेल्या धरण-योजनांचा अधिकृत वृत्तांत, त्यांच्या कामांतील प्रगति व सदर खात्यातर्फें होणाऱ्या घोषणा व घेण्यांत येणारे निर्णय या मासिकांत देण्यांत येतील. सदर मासिकांतील मजकूर सामान्य वाचकांना सहजपणें समजूं शकेल, अशा सोप्या पद्धतीनें मांडण्यांत येईल.

हें मासिक जास्तींत जास्त लोकांना घेतां यावें म्हणून या खात्यानें त्याची वार्षिक वर्गणी अवघी ३ रुपये ठरविली असून विद्यार्थी तांत्रिक संस्था आणि ग्रंथालयें यांना तींत २५ टक्के सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. सदर मासिकाच्या प्रती डायरेक्टर पब्लिकेशन्स डिव्हिजन, माहिती आणि नभोवाणी खातें, दिल्ली यांचेकडे मिळतील.

---

## Cooperation & Accountancy Diploma Board, Poona

### RESULTS OF G. D. C. A. EXAMINATION APRIL 1954

Passed in the whole Examination including those who have passed in one or the other part previously.

**II Class**

Poonawala H. S.

**Pass Class**

Bhide P. K., Bhide S. H., Erram S. S., Konnur G. S., Kulkarni S. K., Modi F. K., Nadkarni R. V., Nemade B.C., Patil V. R., Shalia I.T., Talikoti R. H., Varade V. R., Wadekar S. L., Abhyankar R. D., Das Bhikaricharan., Dixit K. Y., Golwala P. M., Hallikeri R. K., Karhadkar N. N., Kulkarni N. S., Naik B. V., Pawar B. S., Pradhan Y. A., Wani V. B.

**Passed in 'Co-operation' Group only**

Nivargi C. B., Bhave M. M., Degavkar P. S., Inamdar V. L., Pandya S. K., Parikh S. J., Patel C. B., Pise V. D., Soman K. V.

**Passed in 'Accountancy' Group only**

Bhatt N. U., Gajendragadkar M. S., Karkhanis V. R., Muzumdar V. D., Kulkarni S. S., Venkiteshwaran K. N., Patel B. J., Desai V. R., Chaudhari B. A., Ghorpade S. A., Daru K. J., Duduskar S. S., Harip R. B, Goyal Suraj Bhan, Joshi. S. N., Jawale D. G., Luhar K. S., Lakhote N. H., Nehete P. C., Nanivadikar V. R., Patel P. R., Oza A. K., Patki A. G, Pathak R. C., Quanungo N.H., Rakkasagi D.I., Salunkhe S. R., Swadi P. G., Tamankar V. K., Vaishampayan N. V., Yajurvedi G. H.

**P. J. Chinmulgund**
Registrar of Co-operative Societies,
Bombay State, Poona, and
Chairman, Co-operation & Accountancy
Diploma Board, Poona

---

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.